शैक्षणिक वर्ष २०१८-१९ :
अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये
नवीन विषय/अभ्यासक्रमांना मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१०१/१८)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक: १५ जून, २०१८.

संदर्भ : शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४,
दिनांक १३.०९.२०१७.

शासन आदेश

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ अणि संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी नवीन विषय/अभ्यासक्रमांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करण्यात आली. विद्यापीठांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर केलेल्या छाननीनुसार पात्र ठरलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात पुढील विवरणात नमूद केल्यानुसार नवीन विषय/अभ्यासक्रमांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित अभ्यासक्रम/विषय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | मुंबई विद्यापीठ, मुंबई | | |
| १. | १ | चेंबूर कर्नाटका कॉलेज ऑफ लॉ विद्यासागर, घाटला, चेंबूर, मुंबई | विधी<br>(५ वर्षे) (०-६०) |
| २. | २ | झगडूसिंग चॅरीटेबल ट्रस्टचे ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स, ठाकूर हाऊस, कांदिवली (पू.) मुंबई | बी.एम.एस. (इंग्लिश) (०-६०)<br>बी.ए. (फिल्म टेलिव्हिजन ॲण्ड न्यु मिडीया प्रोडक्शन) (०-६०)<br>बी.एस्सी. (सायकोलॉजी) (०-६०)<br>बी.एस्सी. (ॲक्च्यूरियल सायन्स) (०-६०)<br>बी.एस्सी. (डाटा सायन्स) (०-६०) |

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित अभ्यासक्रम/विषय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ३. | ३ | गुरु नानक कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, जी.बी.टी. नगर, मुंबई. | बी.एस्सी. (लाईफ सायन्स) (०-६०)<br>एम.ए. (हिंदी) (०-६०)<br>एम.एस्सी(ऑरगॅनिक केमिस्ट्री) |
| ४. | ४ | ठाकुर कॉलेज ऑफ सायन्स ॲन्ड कॉमर्स ठाकुर श्यामनारायण मार्ग, ठाकुर व्हिलेज, कांदिवली (पू.), मुंबई. | एम.ए. (एंटरटेन्मेन्ट मिडीया ॲण्ड ॲडव्हर्टायझींग) (०-६०) |
| ५. | ५ | ठाकुर कॉलेज ऑफ सायन्स ॲन्ड कॉमर्स ठाकुर श्यामनारायण मार्ग, ठाकुर व्हिलेज कांदिवली (पू.), मुंबई | नविन विषय<br>बी.एस्सी.(स्टॅटीस्टीक्स मेजर/स्पेशल) |
| ६. | ६ | नालंदा एज्युकेशन फाऊंडेशनचे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, विज्ञान आणि वाणिज्य (पदवी) रात्र महाविद्यालय, गालेकरवाडी, पी.एल.लोखंडे मार्ग, चेंबूर रेल्वे स्टेशन जवळ, चेंबूर (पू.) मुंबई | बी.एम.एम. (०-६०)<br>एम.ए. (इतिहास) (०-६०) |
| ७. | ७ | के.श्री. विष्णू वामन ठाकूर चॅरीटेबल ट्रस्टचे भास्कर वामन ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स, यशवंत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स, विद्या दयानंद पाटील कॉलेज ऑफ आर्टस, एम.बी.ईस्टेट, विवा कॉलेज रोड, विरार (प.) जि. पालघर. | बी.ए. (कलीनरी आर्टस)(०-६०)<br>एम.एस्सी. (हॉटेल ॲन्ड हॉस्पिटॅलिटी ॲडमिनिस्ट्रेशन)(०-२०) |
| ८. | ८ | के.श्री. विष्णू वामन ठाकूर चॅरीटेबल ट्रस्टचे, भास्कर वामन ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स, यशवंत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स, विद्या दयानंद पाटील कॉलेज ऑफ आर्टस, एम.बी.ईस्टेट, विवा कॉलेज रोड, विरार (प.) जि. पालघर | नविन विषय<br>बी.ए. (सायकॉलॉजी)<br>बी.ए. (फिल्मी, टेलिव्हिजन ॲन्ड न्यु मिडीया प्रोडक्शन)<br>बी.ए. (इंग्रजी) ऑप्शनल (तृतीय वर्ष) |
| ९. | ९ | सेंट विल्फ्रेड एज्यूकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स, शेडुंग, जुना मुंबई-पुणे हायवे, शेडुंग टोल नाका जवळ, ता. पनवेल,<br>जि. रायगड | एम.ए. (इंग्लिश) (०-६०)<br>एम.एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) (०-२०)<br>एम.एस्सी. (फिजीक्स) (०-२०) |

संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

४. संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या विषय/अभ्यासक्रमांचा नियतकालिक आढावा घेऊन सदर विषय/अभ्यासक्रमांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर विषय/अभ्यासक्रमांची मान्यता रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २४४६/२०१३ व २४४८/२०१३ मध्ये उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ व विभागीय सहसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(द.व. खारके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
४) संबंधित संस्था,(विद्यापीठामार्फत)
५) निवड नस्ती (मशि-४).